**नागरी क्षेत्रातील पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.टंचाई २००६/प्र.क्र.२२१/पापु १४,**
**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.**
**दिनांक :- ०४ नोव्हेंबर, २००६.**

**वाचा :-** १) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई २०९९/प्र.क्र.१२/पापु १४, दि.२ फेब्रुवारी, १९९९.
२) शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.टंचाई २०९९/प्र.क्र.३४/पापु १४, दि.१३ सप्टेंबर, २००६.

**परिपत्रक :-**

सन २००६-०७ च्या टंचाई कालावधीस आता सुरुवात झालेली आहे. नुकत्याच संपलेल्या पावसाळ्यात राज्याच्या बहुतेक भागात चांगला पाऊस झालेला आहे. त्यामुळे महानगर पालिका / नगर पालिका यांच्या पाणी पुरवठा योजनांच्या उद्‌भवामध्ये पुरेसा पाणीसाठा उपलब्ध झालेला आहे. या पाणी साठयाचे जून-२००७ पर्यत सुयोग्य नियोजन केल्यास, ब-याच नागरी भागात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही. नागरी क्षेत्रातील पिण्याचे पाणी टंचाई निवारणार्थ संदर्भ क्र.१ येथील शासन आदेशानुसार सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. शहरात पाणी टंचाई निवारणार्थ उपाययोजनेची निवड करीत असतांना, ती या शासन आदेशानुसार तसेच किमान खर्चाची असेल याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये 'क' वर्ग नगरपालिकांसाठी विहित निकषातील तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी देखील ५% लोकवर्गणी अनिवार्य करण्यात आलेली आहे. 'क' वर्ग नगरपालिका क्षेत्रात तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना मंजूरी देताना सदर आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

२. नागरी क्षेत्राच्या पाणी पुरवठा योजनांसंदर्भात शासनाच्या निदर्शनास आलेल्या अनियमितता तसेच प्रस्तावातील त्रृटी, क्षेत्रीय कार्यालयामार्फत होणारी दिरंगाई इत्यादी बाबी विचारात घेवून, खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) ब-याच नगरपालिका दरवर्षी तातडीच्या पाणी पुरवठा योजना, क्षेत्रीय स्तरावर मंजूर करुन घेतात असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. नगर पालिकांच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेस मंजूरी देताना, त्या नगर पालिका क्षेत्रात सद्यस्थितीत दर माणशी, दर दिवशी होणारा पाणी पुरवठा नमूद करुन योजना मंजूर करण्याचे समर्थनही करण्यांत यावे. योजना मंजूरीचे आदेश विहित प्रारुपात व जिल्हाधिका-यांचे स्वाक्षरीनेच काढावेत.

२) नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव शासन निर्णय, दि.०२ फेब्रुवारी, १९९९ मधील सूचनांचे अनुषंगाने तपासणे आवश्यक आहे. काही नगरपरिषदांकडून विहित निकषाबाहेरील सादर झालेल्या प्रस्तावांना जसे की, नदीच्या पात्रात वाळूंचे बंधारे घेणे, शहरात उंच टाक्या बांधणे, वितरण व्यवस्था करणे, विहिरीला प्लास्टर करणे, विंधण विहिरीवरील/ विहिरीवरील विद्युत पंप दुरुस्ती करणे व बदलणे, नियमीत योजनेमध्ये समांतर पाईपलाईन टाकणे, व्हॉल्व बदलणे, पाईपपाईन दुरुस्त करणे, स्टँडबाय पंपींग मशिनरी घेणे इत्यादी कामांना (अशा बाबी नेहमीच्या देखभाल/दुरुस्तीचा भाग म्हणून नगर पालिका/ महानगर पालिका यांनी स्वत:च्या निधीतून / पाणीपट्टीच्या उत्पन्नातून करणे क्रमप्राप्त आहे.) जिल्हाधिकारी / विभागीय आयुक्त कार्यालयाकडून प्रशासकीय मंजूरी देऊन शासनाकडे अनुदानाची मागणी करण्यात येते. अशा प्रस्तावांना मंजूरी देणे अपरिहार्य असल्यास असे प्रस्ताव शासनाकडे विशेष बाब म्हणून मान्यतेसाठी सबळ कारणासहित सादर करावेत. विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणी पुरवठयाच्या प्रस्तावांना क्षेत्रीय स्तरावर मंजूरी देण्यात आल्यास त्यासाठी शासनाकडून अनुदान उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

३) तातडीच्या योजना प्रस्तावित करणेपूर्वी शहरातील विंधणविहिरी, विद्युतपंप, साध्या विहिरी इत्यादी सर्व पाणी पुरवठयाची साधने नगर पालिकेने सुस्थितीत ठेवली आहेत की नाही, विंधण विहिर पुर्नभरणाची किती कामे पूर्ण केली आहेत याबाबत पाहणी करावी. ब-याच नगर परिषदा विशेष बाब म्हणून शासनाकडे प्रस्ताव सादर करतानाच क्षेत्रीय स्तरावर स्वतंत्रपणे वेगळयाने तातडीच्या योजना मंजूर करुन घेत असतात. तसेच, काही नगर पालिका नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनेतील काही कामांना क्षेत्रीय स्तरावर मंजूरी घेऊन उर्वरित प्रस्ताव शासनाकडे विशेष बाब म्हणून मान्यतेसाठी सादर करतात. या संदर्भात सूचित करण्यात येते की, ज्या नगर परिषदा/नगरपालिका/महानगरपालिकांचे विशेष बाब म्हणून प्रस्ताव शासनाकडे पाठविणे प्रस्तावित असेल वा सादर झालेले असतील अशा नागरी भागासाठी क्षेत्रीय स्तरावर पुन्हा वेगळयाने विहित आर्थिक व भौतिक निकषातील प्रस्तावांना मंजूरी देण्यात येऊ नये. शहरातील पिण्याच्या पाण्याची एकंदर परिस्थिती विचारात घेऊन प्रस्ताव एकत्रितच सादर करावेत. एखाद्या प्रकरणी, निकषात बसणा-या प्रस्तावांना क्षेत्रीय स्तरावर मान्यता दिल्यावरही कालांतराने काही अपरिहार्य कारणांमुळे त्या शहरासाठी विशेष बाब म्हणून पुन्हा प्रस्ताव सादर करणे आवश्यक असल्यास त्यामध्ये पुर्वी मंजूर केलेल्या योजनेचा तपशील नव्या योजनेला शिफारस करण्यामागील स्पष्टीकरण सादर करावे.

४) विभागीय आयुक्त / जिल्हाधिकारी त्यांचेकडून शासनास विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी सादर होणा-या प्रस्तावांची ब-याच वेळेला आवश्यक ती छाननी क्षेत्रीय स्तरावर योग्य त-हेने न करता मोघम स्वरुपातील प्रस्ताव शासन स्तरावर मान्यतेसाठी सादर केले जातात. अशा प्रस्तावांना संबंधीत क्षेत्रिय कार्यालय प्रमुखाची / विभाग प्रमुखाची स्पष्ट शिफारस आवश्यक असताना केवळ "शासनाच्या मान्यतेसाठी सादर", "विशेष

बाब म्हणून मंजूरी द्यावी" असे मोघम अभिप्राय दिलेले आढळून येतात. तसेच प्रस्ताव तपासताना नागरी संस्थेच्या क्षेत्रातील सध्याची पाणी उपलब्धतेची साधने, लोकवर्गणी भरणे, योजनेची पुढील देखभाल दुरुस्ती करण्यास संबंधीत संस्था तयार असल्याबाबतचा ठराव, पाण्याचे आरक्षण केलेले असल्यास तसा ठराव इत्यादी बाबी तपासून पाहणे आवश्यक आहे. विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांनी असे प्रस्ताव आपल्या सुस्पष्ट शिफारशींसह शासनास सादर करावेत.

५) क्षेत्रीय स्तरावरील योजनेस प्रशासकीय मान्यता देताना, संबंधीत नगर परिषदेने / नगर पालिकेने मागील टंचाई कालावधीत घेतलेल्या तातडीच्या योजनेचे उपयोगिता प्रमाणपत्र तपासून ते मंजूरी आदेशासह शासनास सादर करणे आवश्यक आहे. विशेष बाब म्हणून शासनास प्रस्ताव सादर करताना, मागील वर्षी घेतलेल्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेचे उपयोगिता प्रमाणपत्र पुर्वी सादर केलेले नसल्यास सोबत जोडणे आवश्यक आहे.

६) मंजूर प्रस्तावाच्या तुलनेत खर्चात बचत झालेली असल्यास, अतिरिक्त अनुदान शासनास परत केले आहे की नाही याची खात्री करुन तसा उल्लेख उपयोगिता प्रमाणपत्रात असणे आवश्यक आहे. मागील उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी नवीन तातडीच्या पाणी पुरवठा योजना मंजूर करु नये.

७) नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजना मंजूरीचा उद्देश शहरातील संबंधीत लोकसंख्येस ऐन उन्हाळयात किमान पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, असा आहे. मात्र शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, शासन स्थायी आदेशातील दिनांक १० जून पर्यतची मर्यादा विचारात घेऊन योजनांच्या मंजूरीचे आदेश विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी कार्यालयांकडून निर्गमित केले जातात. वस्तुनिष्ठपणे विचार केला तर जूनच्या मध्यापासून जुलैच्या मध्यापर्यत महाराष्ट्रात सर्वत्र नियमित पावसास सुरुवात होते. त्यामुळे दि.१०जून रोजी मंजूर केलेल्या योजनेच्या पुर्णत्वास लागणारा किमान वेळ विचारात घेतला तरी, ऐन उन्हाळयात या योजनेव्दारे लोकांना पिण्याचा पाणी पुरवठा करण्याचा मुख्य हेतु साध्य होत नाही. सबब, दि.१० जून पर्यत योजना मंजूरीचे अधिकार क्षेत्रीय कार्यालयांना असले तरी, दि.३१ मार्च नंतर तातडीच्या पाणी पुरवठा योजना क्षेत्रीय स्तरावर मंजूर करण्यात येऊ नयेत. अन्यथा, त्याचे ठोस समर्थन मंजूरी आदेशात करण्यात यावे.

८) नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनांचे प्रस्ताव विहित वेळेत मंजूरीसाठी सादर होतील याची दक्षता घेण्याच्या सूचना सर्वसंबंधीतांना द्याव्यात. क्षेत्रीय कार्यालयाकडे प्राप्त होणा-या विहित निकषातील, तसेच विशेष बाब म्हणून मान्यता द्यावयाच्या नागरी तातडीच्या प्रस्तावांना, क्षेत्रीय स्तरावर मंजूरी मिळणे/ शासन स्तरावर शिफारशींसह मान्यतेसाठी सादर करणे ही कार्यवाही विहित कालावधीमध्ये पूर्ण करणे अनिवार्य आहे. ब-याचदा विभागीय आयुक्त/ जिल्हाधिकारी स्तरावर विशेष बाब म्हणून मान्यता द्यावयाच्या योजनांचे प्रस्ताव दिर्घकाळ अनेक दिवस प्रलंबीत राहतात. परिणामी शासन स्तरावर लोकप्रतिनिधी / प्रसार माध्यमे यांच्या तक्रारी करण्यात येतात. या संदर्भात योग्य ती काळजी घेण्यात यावी.

९) योजनांसाठी मंजूर केलेले अनुदान कोषागारातून वेळीच काढण्यात न आल्याने ते व्यपगत झाल्याचेही अनेक प्रकरणी दिसून आले आहे. याबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी. तसेच लोकवर्गणीचा हिस्सा संबंधीत संस्थेने भरलेला आहे किंवा कसे ही बाब तपासून पाहणे आवश्यक आहे.

१०)शासन स्तरावर तसेच क्षेत्रीय स्तरावर मंजूर केलेल्या नागरी तातडीच्या पाणी पुरवठा योजनांसाठी शासनाकडून ५० टक्के अनुदान उलपब्ध करुन देण्यात आलेले आहे, अशा योजनांसाठी उर्वरित अनुदानाची मागणी करताना ती पुढील विवरण पत्रात करावी.

| नगर पालिका / महा नगर पालिके चे नाव | योजनेचा मंजूर खर्च (रु.लक्ष) मंजूरीचा दिनांक | स्विकारले ल्या निविदांची किंमत (रु.लक्ष) | स्तंभ ३ चे अनुषंगाने लोक वर्गणीचा हिस्सा (रु.लक्ष) | कामांची प्रगती | | योजना अपुर्ण असल्यास सद्यस्थिती | योजनेवर झालेला प्रत्यक्ष खर्च (रु.लक्ष) | प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या आधारे जमा झालेल्या लोक वर्गणीची रक्कम (रु.लक्ष) | आता पर्यत उपलब्ध करुन दिलेले अनुदान (रु.लक्ष) | लोक वर्गणी वजा जाता प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या आधारे आवश्यक अनुदान (रु.लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | योजना पूर्ण करण्याचा नियोजन दिनांक | योजना प्रत्यक्षात कार्यान्वित झाल्याचा दिनांक | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५अ | ५ब | ६ | ७ | ८ | ९ | १० |

३. एकंदरीत, तातडीच्या योजनेबाबतचे प्रस्ताव शासनाच्या स्थायी आदेशानुसार तपासून, आवश्यक असेल तर शासनाकडे विशेष बाब म्हणून मंजूरीसाठी कालापव्यय न होता वेळीच सादर होतील याबाबत काटेकोर दक्षता घ्यावी. क्षेत्रीय स्तरावर योजना मंजूर करताना, त्या विहित आर्थिक व भौतिक मर्यादेत बसत असल्याची खात्री करुन घेऊनच मंजूर केली जावी व योजनेच्या मंजूरी आदेशाच्या प्रती तसेच प्रलंबित उपयोगिता प्रमाणपत्रे वेळीच शासनाकडे सादर केली जावीत. तसेच शासनाकडून अनुदान मंजूर झाल्यावर ते संबंधीत यंत्रणेकडे वेळीच उपलब्ध करुन द्यावे. मंजुर योजनांच्या कामांचे प्रगती अहवाल वेळचेवेळी शासनास पाठवावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( वि.शं.धुमाळ )**
**प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाध्किारी.
आयुक्त,सर्व महानगरपालिका ( बृहन्मुंबई महानगरपालिका वगळून)
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
उपसंचालक, भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणा (सर्व)
मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा/ सर्व नगरपालिका
वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
पापु-१४ संग्रहासाठी.

E:\CR २२१-०६ Gr.Pani Puravata Yojana Manyata.doc